ताज्या घडामोडींसाठी वाचा
Kesari E-Paper Portal
http://www.dailykesari.com
http://www.dailykesari.com/epapaer/

**सोने | चांदी**
सांगली | १०१,२०० | १,१६,३००

**अंडी भाव**
राष्ट्रीय अंडी समन्वय समिती (मिरज)
दि. ८ ऑगस्ट २०२५
५०० मुंबई (नेकरट)
- मिरज फॉडी रेट
(किरकोळ ६५ रु. डझन)
ब्रॉयलर जिवंत पक्षी नंदा ग्रुप ९५ रुपये प्रतिकिलो

**तापमान**
सांगली २७° c
कोल्हापूर २७° c

**शेअर बाजार**
- सेन्सेक्स : ८०,७२३.२६
- निफ्टी : २४,५९६.१५
- युएस डॉलर : ८७.४५
- युरो : १०१.९२

**जाता-जाता**




दिल्लीश्वराचा वरदहस्त असला की उंदीरसुद्धा वाघ होतो, हे तुम्हाला माहिती आहेच की...

# ‘आरोग्य’चा कॉम्पॅक्टर दुरुस्तीअभावी बंद

## कचरा उठाव प्रश्न गंभीर : बिले अदा न केल्याने गाड्यांची दुरुस्ती थांबविली

केसरी वृत्तसेवा

**सांगली** : महापालिकेच्या आरोग्य विभागातील ७ पैकी फक्त एक कॉम्पॅक्टर सुरू आहे. महापालिका क्षेत्र कचरामुक्त करण्याच्या नादात कचरा भरलेल्या घंटागाड्या एकच असलेल्या कॉम्पॅक्टरमध्ये कचरा भरण्यासाठी भर रस्त्यावरच घंटागाड्यांची रांग लागत आहे. आता याला जबाबदार कोण?, हा खरा प्रश्न आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. १ व २ च्या कार्यक्षेत्रातील कचरासंकलित करण्यासाठी एकूण ७ कॉम्पॅक्टर आहेत. त्यातील फक्त १ कॉम्पॅक्टर सुरू असून, उर्वरित ६ कॉम्पॅक्टर किरकोळ दुरुस्तीअभावी बंद आहेत. मनपाने मागील बिल न दिल्याने दुरुस्ती करणाऱ्या मक्तेदाराने गाड्या दुरुस्त करण्यास नकार दिल्याचे समजते. महानगरपालिकेचे स्वत:चे वर्कशॉप असताना त्या ठिकाणी फक्त आणि फक्त गाड्या धुण्याचेच काम केले जाते. त्यामुळे ‘असून अडचण आणि नसून खोळंबा’, अशी अवस्था वर्कशॉप विभागाची झाली आहे.

महापालिका क्षेत्र कचरामुक्त करण्याचे धोरण राबविले जात असल्यामुळे घंटागाड्यांच्या माध्यमातून संकलित केलेला कचरा थेट कॉम्पॅक्टरमध्येच क्रॉसिंग केला जातो. पण कॉम्पॅक्टरच उपलब्ध नसल्याने घंटागाड्या कॉम्पॅक्टरच्या प्रतीक्षेत थांबून राहत असल्याने रांगा लागल्याने कचरा संकलनावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे कचरा कोठे टाकायचा, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहे.



हे वडापचे ठिकाण नव्हे तर महापालिकेच्या घंटागाडीतील कचरा कॉम्पॅक्टरमध्ये भरण्यासाठी घंटागाड्यांची लागलेली रांग आहे.

कचरा उठाव करणारे कॉम्पॅक्टर दुरुस्तीअभावी बंद होणे हा गंभीर प्रकार आहे. याची वरिष्ठांकडून दखल घेऊन कचरा उठाव सुरळीत करण्यात यावा; अन्यथा आंदोलन करावे लागेल.
**- जगन्नाथ ठोकळे,** माजी नगरसेवक.

# आगामी निवडणुका महायुती म्हणूनच लढणार

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील : भाजपच्या कोअर कमिटीची बैठक

केसरी वृत्तसेवा

**सांगली** : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती म्हणूनच लढायचे आहे. या निवडणुकीसाठी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी तयारीला लागावे. ग्रामीण भागासह शहरातील प्रत्येक प्रभागात जाऊन लोकांशी संपर्क साधावा. ग्रामीण भाग, वाडी-वस्तीवर पोहोचा, अशा सूचना भाजपचे नेते व पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केल्या.

भाजप जिल्हा व शहर जिल्हा कोअर कमिटीची बैठक पालकमंत्री पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत चर्चा करण्यात आली. त्यावेळी मंत्री पाटील बोलत होते.

पालकमंत्री पाटील म्हणाले, महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितींच्या निवडणुका महायुती म्हणूनच लढवायच्या आहेत. त्यादृष्टीने पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी कामाला लागावे. प्रत्येक गाव, वाडी-वस्ती तसेच शहरात प्रत्येक वार्डात पोहोचण्याचा प्रयत्न करा. नागरिकांशी संपर्क वाढवा. केंद्र, राज्य शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या विकासाच्या योजना, कामे यांची माहिती लोकांना देऊन निवडणुकीच्या तयारीला लागा.

या बैठकीला भाजपचे जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) सम्राट महाडिक, शहर जिल्हाध्यक्ष प्रकाश ढंग, आमदार सुरेश खाडे, आमदार सुधीर गाडगीळ, आमदार गोपीचंद पडळकर, सत्यजित देशमुख, पृथ्वीराज देशमुख, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संग्रामसिंह देशमुख, भाजपचे पश्चिम महाराष्ट्र संघटनमंत्री मकरंद देशपांडे, भाजप किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष पृथ्वीराज पवार, माजी आ. दिनकर पाटील, भाजप नेत्या नीता केळकर व कोअर कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

✲ **नवी दिल्ली** : निवडणूक आयोगाने ९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी गुरुवारी अधिसूचना जारी केली. अधिसूचनेनुसार, नामांकन प्रक्रिया सुरू झाली असून, २१ ऑगस्टपर्यंत नामांकन दाखल करता येईल.

**इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर, जि. सांगली.**
**जाहीर निवेदन**

मा. जिल्हाधिकारीसो, सांगली यांचे सुचनेनुसार शहर सुशोभिकरण अभियान कार्यक्रमाअंतर्गत इस्लामपूर शहरातील दत्त टेकडी मागील बाजूस १३५८.४ (चौ.मी.) जागेत क्रिडांगण विकसित करणे, मदिना कॉलनी येथे १००० (चौ.मी.) जागेत ऑक्सिजन पार्क विकसित करणे तसेच शिवनगर येथील ३७० (चौ. मी.) जागेत बगीचा विकसित करणे व शहरातील इतर सुशोभिकरणाची कामे करून घेणेबाबत इस्लामपूर शहरातील सर्व खाजगी संस्था/बँकांचे सी.एस.आर./सेवाभावी संस्था/दानशूर व्यक्ती यांचेमार्फत करून घेणेबाबत निर्णय झाला आहे. अशा सर्व खाजगी संस्था/बँकांचे सी.एस.आर./सेवाभावी संस्था/दानशूर व्यक्ती यांना जाहीर निवेदनाद्वारे आवाहन करणेत येते की, ज्यांना शहरातील वर नमूद करणेत आलेली सुशोभिकरणाची कामे स्वखर्चाने करणेचे आहे. त्यांनी मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर यांचेशी संपर्क साधावा.

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर
जा.क्र./इनपा/कार्या-१२/३२१५/२०२५
दिनांक - ०७/०८/२०२५

**(पृथ्वीराज पाटील)**
**मुख्याधिकारी**
**इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर**

# संदेशच्या बहिणीने संशयिताच्या आईला अपशब्द वापरल्याने केला खून

## जयसिंगपूरमधील घटनेचा उलगडा : तिघांना अटक

केसरी वृत्तसेवा

**जयसिंगपूर** : चिपरी (ता. शिरोळ) येथे बुधवारी भरपावसात पाठलाग करून संदेश लक्ष्मण शेळके (वय २१, रा. चिपरी) या तरुणाचा खून झाला होता. याप्रकरणी जयसिंगपूर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरविल अवघ्या ६ तासात या खुनाचा उलगडा केला. संदेश याच्या बहिणीने संशयित युवराज माळी याच्या आईबद्दल अपशब्द वापरल्याचा राग मनात धरून चिपरी येथे संदेशचा खून केल्याची कबुली संशयितांनी दिली आहे.

याप्रकरणी युवराज रावसाहेब माळी (वय ३०), गणेश संभाजी माळी (वय २५, दोघे रा. चिपरी, ता. शिरोळ) व सूरज बाबासो ढाले (वय ३०, रा. खोची, ता. हातकणंगले) यांना जयसिंगपूर पोलिसांनी बुधवारी रात्री अटक केली. गुरुवारी जयसिंगपूर येथील न्यायालयासमोर तिघांना उभे केले असता, ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

याबाबत अधिक माहिती अशी, चिपरी येथे खून झाल्यानंतर जयसिंगपूर पोलिसांनी २ सीसीटीव्हींची पडताळणी करून त्याचबरोबर गोपनीय माहिती मिळाल्यानंतर या खुनात तिघांचा सहभाग असल्याचे पोलिसांना लक्षात आले. त्यानंतर जयसिंगपूर पोलिसांनी चिक्कोडी (जि. बेळगाव) येथे सापळा रचून तिघांना ताब्यात घेतले. संदेश याच्या बहिणीने संशयिताच्या आईबद्दल अपशब्द वापरले होते. हा राग मनात धरून संदेश याकडून लिफ्ट मागण्याचा बहाणा करून घोडावत गेस्ट हाऊस व ऑईल मिलच्यामध्ये असलेल्या सूर्यवंशी यांच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्यावर नेऊन संदेशच्या मानेवर सपासप वार करून खून केला. त्यानंतर सूरज ढाले व गणेश माळी या दोघांच्या मोटरसायकवर चिक्कोडी येथे पळून गेल्याची कबुली संशयितांनी दिली, अशी माहिती पोलीस निरीक्षक सत्यवान हाके यांनी दिली.

सहायक पोलीस निरीक्षक दीपक कदम, पोलीस उपनिरीक्षक प्रवीण माने, युनूस इनामदार, किशोर अंबुडकर, पो.अं.निलेश मांजरे, ताहीर मुल्ला, रहिमान शेख, बाळासाहेब गुत्ते, रूपेश कोळी, जावेद पठाण यांच्या पथकाने ही कारवाई केली.




युवराज माळी, गणेश माळी



सूरज ढाले

# ‘शिक्षण’च्या अधिकाऱ्यांचे आजपासून आंदोलन

केसरी वृत्तसेवा

**सांगली** : शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना संरक्षण देण्यासह चौकशीविना अधिकाऱ्यांना अटक करू नये, या मागणीसाठी शुक्रवारपासून बेमुदत सामूहिक रजा आंदोलन करण्यात येणार आहे.



जिल्हा परिषदेतून

नागपूर विभागातील बोगस शालार्थ आयडी प्रकरणात चोर सोडून संन्याशाला फाशी या म्हणीप्रमाणे तपास यंत्रणा काम करत आहेत. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना कायद्याने दिलेले संरक्षण नाकारून विनाचौकशी अटक झाल्याने शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांमध्ये दहशत आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचे शासनाची परवानगी न घेता विना चौकशी अटकसत्र सुरू असल्याच्या बाबीचा यावेळी निषेध करण्यात आला.

अतिरिक्त दूरदृश्यप्रणाली बैठका आणि सुट्टीच्या दिवशी अतिरिक्त कामाचा ताण कमी करावा, या मागण्यांवर लेखी आश्वासन मिळाले नाही. त्यामुळे न्याय्य मागण्यांसाठी संविधानिक मार्गाने ८ ऑगस्टपासून बेमुदत सामूहिक रजा आंदोलन करण्यात येणार असल्याचे कोल्हापूर विभागीय मंडळाचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी सांगितले.

**अनुसूची II**
**फॉर्म बी**
**जाहीर घोषणा**
(दि इन्सॉलव्हन्सी अँड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया नियमन १२ (लिक्विडेशन प्रक्रिया) विनियम २०१६)

**मार्व्हलस् मेटल्स प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्यासाठी**

| अ.नं. | विशेष | तपशिल |
|---|---|---|
| १ | कार्पोरेट कर्जदाराचे नाव | मार्व्हलस् मेटल्स प्रायव्हेट लिमिटेड |
| २ | कार्पोरेट कर्जदाराच्या प्राधिकरण समावेशाची तारीख | १६/०७/१९८५ |
| ३ | कार्पोरेट कर्जदार ज्यांच्या अंतर्गत स्थापित/नोंदणीकृत आहे असे प्राधिकरण | कंपनी निबंधक कार्यालय, पुणे |
| ४ | कार्पोरेट कर्जदाराचा कार्पोरेट आयडेंटिटी नं./लिमिटेड लायबलिटी आयडेंटीफिकेशन नं. | यू २७२०९ पीएन १९८५ पीटीसी ०३६८५७ |
| ५ | कार्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रधान कार्यालयाचा (असल्यास) पत्ता | नोंदणीकृत कार्यालय - ई-३, एमआयडीसी, गोकुळ शिरगाव, कोल्हापूर, महाराष्ट्र, भारत, ४१६२३४. प्रधान कार्यालय- सी-१२ आणि बी-७१, एमआयडीसी, गोकुळ शिरगाव, कोल्हापूर, महाराष्ट्र, भारत, ४१६२३४ |
| ६ | नादारी निर्णय प्रक्रियेच्या समाप्तीची तारीख | ०४.०८.२०२५ |
| ७ | कार्पोरेट कर्जदाराच्या बाबतीतील नादारीच्या प्रारंभाची तारीख | ०४.०८.२०२५ (आदेशाची प्रत ०६.०८.२०२५ रोजी मिळाली) |
| ८ | लिक्विडेटर म्हणून कार्यरत असलेल्या नादारी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | नाव : अतुल राजवाडकर नोंदणी क्र. आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी००१५२/२०१७-२०१८/१०३२१ |
| ९ | मंडळाकडे नोंदविल्याप्रमाणे लिक्विडेटर व्यावसाईकाचा पत्ता व ई मेल | **नोंदणीकृत पत्ता :** ४७, हिंदुस्थान कॉलनी, वर्धा रोड, नागपूर-४४००१५. **ई मेल :** vervecapital@gmail.com |
| १० | लिक्विडेटरबरोबरील पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई मेल | पत्र व्यवहारासाठी पत्ता - ४७, हिंदुस्थान कॉलनी, वर्धा रोड, नागपूर-४४००१५ **ई मेल-** cirp.marvelous@resurgentripl.com |
| ११ | दावे सादर करण्याची शेवटची तारीख | ०३.०९.२०२५ |

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण मुंबई खंडपीठाने ०४.०८.२०२५ रोजी मार्व्हलस मेटल्स प्रायव्हेट लिमिटेडचे लिक्विडेशन सुरू करण्याचे आदेश दिले आहेत (०६.०८.२०२५ रोजी आदेशाची प्रत मिळाली).

मार्व्हलस मेटल्स प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांना ०३.०९.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी त्यांचे दावे पुराव्यांसह आयटम क्रमांक १० विरुद्ध नमूद केलेल्या पत्त्यावर लिक्विडेटरकडे सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

वित्तीय कर्जदारांनी त्यांचे दावे पुराव्यांसह इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच सादर करावेत. इतर सर्व कर्जदार पुराव्यासह दावे वैयक्तिकरित्या, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

दाव्यांचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड होऊ शकतो.

जर एखाद्या भागधारकाने लिक्विडेशन प्रक्रियेदरम्यान त्यांचे दावे सादर केले नाहीत, तर अशा भागधारकाने द इन्सॉलव्हन्सी अँड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तींसाठी दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियम, २०१६ अंतर्गत कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेदरम्यान सादर केलेले दावे कलम ३८ अंतर्गत सादर केले असल्याचे मानले जाईल.

सही/-
**सीए अतुल राजवाडकर**
**मार्व्हलस् मेटल्स प्रायव्हेट लिमिटेडचे लिक्विडेटर**
**ईमेल :** cirp.marvelous@resurgentripl.com
**नोंदणीकृत पत्ता :- ४७, हिंदुस्थान कॉलनी, वर्धा रोड, नागपूर-४४००१५**
**नोंदणी क्रमांक :-** IBBI/IPA-001/IP-P00152/2017-18/10321

**दिनांक : ०८.०८.२०२५**
**ठिकाण: नागपूर**

# हाय्यरचे उपाध्यक्ष डी. आर. महाजन यांचे निधन

केसरी वृत्तसेवा

**शिराळा** : येथील हाय्यर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष डी. आर. तथा दत्तात्रय महाजन (वय १००) यांचे निधन झाले. नुकताच त्यांचा १०० वा वाढदिवस महाजन कुटुंबीयांनी साजरा केला होता.



डी. आर. महाजन

त्यांनी दीर्घकाळ वारणा प्रसाद विद्यालय बिळाशी येथे मुख्याध्यापक म्हणून उल्लेखनीय काम केले. विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून त्यांची ख्याती होती. सातारा येथील प्रसिद्ध उद्योगपती जयंत महाजन व शिराळा येथील पत्रकार अजित महाजन यांचे ते वडील होते, तर ज्येष्ठ साहित्यिक प्रा. वैजनाथ महाजन व ज्येष्ठ पत्रकार व सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष सुमंत महाजन यांचे काका होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, विवाहित मुलगी, सुना, नातवंडे, पुतणे असा परिवार आहे. रक्षाविसर्जन आज, शुक्रवार दि. ८ रोजी सकाळी ९ वाजता शिराळा येथे होणार आहे.

# उमदी येथे पुन्हा चोरी; दोन दुकाने फोडली

केसरी वृत्तसेवा

**उमदी** : येथे लोणी कॉम्प्लेक्समधील लोणी ॲग्रो औषध दुकान व माऊली मोबाईल शॉपी या दोन्ही दुकानांवरील पत्रे काढून चोरट्यांनी आत प्रवेश केला. यावेळी लोणी ॲग्रोमधील ड्रॉव्हरमध्ये असलेले पैसे व माऊली मोबाईल शॉपीमधील मोबाईलसह इतर साहित्य चोरट्यांनी चोरून नेले. ही घटना सोमवारी रात्री घडली. उटगी दरोडा प्रकरण, उमदी येथील माळी, टकले, हेंबाडे यांची मोटर रिवायडिंग दुकानात चोरी, कोटी कापड दुकान चोरी तसेच माड्याळ येथील सुपर बाजारमधील चोरीच्या घटना ताज्या असतानाच पुन्हा दोन दुकानांत चोरीची घटना घडली.

## तीन जवान चकमकीत जखमी

**श्रीनगर** : जम्मू-काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यात दहशतवाद्यांबरोबरील चकमकीत गुरुवारी तीन जवान जखमी झाले. मागील सात दिवसांपासून ही कारवाई सुरू असून दोन्ही बाजूकडून अधून-मधून गोळीबार सुरू आहे.

## निधन वार्ता



### दत्तात्रय चौगुले

**मांगले** : येथील दत्तात्रय निवृत्ती चौगुले (वय ७३) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. रक्षाविसर्जन आज, शुक्रवार, दि. ८ रोजी होणार आहे.



### केशव पाटील

**कवठेमहांकाळ** : येथील केशव भाऊ पाटील (वय ९६) यांचे निधन झाले. ते वारकरी संप्रदायातील प्रमुख होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, पाच मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रक्षाविसर्जन शनिवारी सकाळी ९ वाजता करोली टी येथे होणार आहे.



### संतोष स्वामी

**भिलवडी** : माळवाडी (ता. पलूस) येथील संतोष शिवाजी स्वामी (वय ४८) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ असा परिवार आहे. रक्षाविसर्जन व कार्य शुक्रवार, दि. ८ रोजी सकाळी साडेआठ वाजता होणार आहे.



### सलीम मेस्त्री

**सांगली** : खणभाग येथे राहणारे सलीम इब्राहिम मेस्त्री (वय ६८) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. जियारत विधी आज, शुक्रवारी सकाळी १० वाजता मार्केट यार्ड कब्रस्तान येथे होणार आहे.



### गंगुबाई पाटील

**वाळवा** : नवेखेड येथील गंगुबाई रंगराव पाटील (वय ८६) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात सहा मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या महादेव पाणीपुरवठा सहकारी संस्थेचे व्हाईस चेअरमन प्रकाश पाटील व माजी व्हाईस चेअरमन सहदेव पाटील यांच्या मातोश्री होत. रक्षाविसर्जन शुक्रवार, दि. ८ रोजी सकाळी १० वाजता जुनेखेड येथे होणार आहे.

# वज्रचौंडे चोरीप्रकरणी दोघांना अटक

## हिसडा मारून महिलेच्या गळ्यातील सोन्याची केली होती चोरी

केसरी वृत्तसेवा

**सांगली** : वज्रचौंडे (ता. तासगाव) येथील महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन हिसडा मारून लंपास करणाऱ्या प्रवीण भगवान गायकवाड (वय २८, रा. मळणगाव, ता. तासगाव) व रोहित अदिकराव सपकाळ (वय २३, रा. गौरगाव, ता. तासगाव) या दोघांना अटक करण्यात आली. स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पथकाने या गुन्ह्याचा छडा लावून १ लाख १५ हजारांची सोन्याची चेन व गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा १ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

वज्रचौंडे येथील प्रियांका अर्जुन यादव या दि. २१ जुलै रोजी सकाळी पावणे सहाच्या सुमारास फिरायला गेल्या होत्या. तेव्हा रस्त्यावर कोणी नसल्याचे पाहून दोघा चोरट्यांनी दुचाकीवरून येऊन यादव यांच्या गळ्यातील सोन्याची चेन हिसडा मारून लंपास केली. त्यांनी आरडाओरड केला, परंतु चोरटे पसार झाले होते. याबाबत त्यांनी तासगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.



अटक केलेल्या दोन संशयितांसह स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस अधिकारी व कर्मचारी.

गुन्हे अन्वेषणचे सहायक निरीक्षक नितीन सावंत यांच्या पथकातील कर्मचारी प्रकाश पाटील व सागर टिंगरे यांना जुना जकात नाका, माधवनगर परिसरात दोघे संशयित चोरीचे सोने विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने परिसरात जाऊन खात्री केली. दोघे संशयित थांबल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांना ताब्यात घेतले. दोघांची झडती घेतल्यानंतर प्रवीण याच्या पॅन्टच्या खिशात सोन्याची चेन मिळाली. चौकशी केल्यानंतर त्याने पंधरा दिवसापूर्वी वज्रचौंडे गावाजवळ महिलेच्या गळ्यातील चेन चोरल्याची कबुली दिली. दोघांना चोरीचा दागिना व दुचाकीसह तासगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

गुन्हे अन्वेषणचे निरीक्षक सतीश शिंदे, सहायक निरीक्षक नितीन सावंत, पंकज पवार, कर्मचारी दरिबा बंडगर, सतीश माने, संदीप नलावडे, सागर लवटे, अनिल कोळेकर, संदीप गुरव, अमर नरळे, उदयसिंह माळी, अमिरशा फकीर, मच्छिंद्र बर्डे, संदीप पाटील, नागेश खरात यांच्या पथकाने ही कारवाई केली.

महावितरण

**ई-निविदा द्वितीय मुदतवाढ सूचना**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सांगली ग्रामीण कार्यालयांतर्गत असणाऱ्या उपविभागामध्ये RCI या वर्गवारीतील व २० KW पेक्षा कमी भार असलेल्या लघुदाब ग्राहकांचे मासिक मिटर रिडींग मोबाईल ॲप / एच. एच.यु. द्वारे घेणे, विज बिल प्रिंटींग व बिल वाटप करणेकामी तीन वर्षाच्या करारावरती मान्यता प्राप्त नामांकित परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नामिकाप्रविष्ट (Empanelment) करणेकामी ई-निविदा क्रमांक **टी-१३ ते टी-१७/२०२५-२६** महावितरण कंपनीच्या संकेतस्थळावर https://etender.mahadiscom.in/eatApp वर **दिनांक - १८.०७.२०२५** पासून उपलब्ध करणेत आलेल्या आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| Sr. No. | Name of Division | Name of tender | Tender No | Tender Amount in Lakhs |
|---|---|---|---|---|
| 1. | Sangli Rural | Monthly Meter Reading of LT consumers Vishrambag Subdivision | **EE/SGLR/LT Meterreading/ VISHRAMBAG/T-13/25-26** | Rs.125.90 |
| 2. | | Monthly Meter Reading of LT consumers Miraj R1 Subdivision | **EE/SGLR/LT Meterreading/ Miraj R1/T-14/25-26** | Rs 97.48 |
| 3. | | Monthly Meter Reading of LT consumers Tasgaon-1 Subdivision | **EE/SGLR/LT Meterreading/ Tasgaon-1/T-15/25-26** | Rs 81.83 |
| 4. | | Monthly Meter Reading of LT consumers Tasgaon-2 Subdivision | **EE/SGLR/LT Meterreading/ Tasgaon-2/T-16/25-26** | Rs 153.60 |
| 5. | | Monthly Meter Reading of LT consumers Savalaj Subdivision | **EE/SGLR/LT Meterreading/ Savalaj/T-17/25-26** | Rs 68.38 |
| | | **Division Total Amount** | | **Rs.527.19** |

निविदा भरण्याची अंतीम मुदत **दि. १८.०८.२०२५ सकाळी ११.०० वाजेपर्यंत** आहे.
संपर्क - कार्यकारी अभियंता, सांगली ग्रामीण विभाग, विश्रामबाग सांगली ४१६-४१६
दूरध्वनी क्रमांक- ७८७५७६९५२८

**HRPRO No.187 / 2025.**

**कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग, सांगली**